क्र•पुविसं/शाखा आय-१/मान्यता
पुणे -४११०१०

दिनांक - ६.११.१९८६

प्रति -
मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका
सिध्देश्वर हायस्कूल
भोसरी - जि. पुणे

**SIDHESHWAR HIGH SCHOOL**
RECOG. No. SSN/1084/7250/S/MH-SHI-I
DATED 28 SEPT, 1984

विषय - माध्यमिक शाळांना तात्पुरती प्रथम मान्यता व सांकेतिक क्र• देण्याबाबत••

महोदय/महोदया,

मंडळ नियमावली , २८(१) अन्वये आपण या मंडळाची प्रथम मान्यता मिळविण्यासाठी केलेल्या अर्जाच्या संदर्भात आपणास कळविण्यात येते की, सन १९८६-८७ मध्ये होणाऱ्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षेस (मार्च/ऑक्टोबर विद्यार्थी पाठविण्यासाठी आपल्या शाळेस शिक्षण उपसंचालक यांनी घातलेल्या अटींच्या पूर्ततेवर तात्पुरती प्रथम मान्यता व 11.250 हा तात्पुरता सांकेतिक क्र• इंग्रजी या माध्यमाकरिता देण्यात येत आहे•

शाळेने नोंदणी शुल्काची रक्कम आपल्या गावातील अगर गावानजिकच्या महाराष्ट्र बँकेच्या शाखेत मंडळाच्या खाते क्रमांक X मध्ये भरावी व भरणा केल्याचे पुणे कार्यालयास चलनाच्या प्रतीसह कळवावे•

पुणे विभागीय मंडळाची नाशिक/कोल्हापूर ही दोन उपकार्यालये असून आपली शाळा ---------------- या उपकार्यालयाच्या कक्षेत येत असल्याने आपण खाली नमूद केलेल्या पत्त्यावर परीक्षेसंबंधीच्या सर्व पत्रव्यवहारार्थ समक्ष संपर्क साधावा•

कार्यालयाशी पत्रव्यवहार करताना शाळेचा निर्धारित सांकेतिक क्र• असणे आवश्यक आहे• याची कृपया नोंद घ्यावी•

आपला विश्वासू,

०/म/५/२३/८८-८९
Ma-sh.

"यशवंतराव चव्हाण भवन"
पुणे जिल्हा परिषद, शिक्षणविभाग.
जा.क्र./शिक्षण/माध्य/ह ४/८८-८९
पुणे-११. दिनांक :- ५.१.१९८९

POST

प्रति,
मुख्याध्यापक, हायस्कूल
----------------------------------

विषय :- १९८३-८४ या शैक्षणिक वर्षापासून परवानगी दिलेल्या नविन माध्य. शाळांना ५ वी ते ७ वी चे वर्ग सुरु करण्यास परवानगी देणेबाबत.

उपरोक्त विषयानुसार कळविण्यात येते की, शासनाने १९८३-८४ या शैक्षणिक वर्षापासून इ.८वी पासून मान्यता दिलेली आहे. अशा शालेय इ.५ वी ते ७वी चे वर्ग माध्यमिक विभागात सुरु करावयाचे असल्यास सदर बाबतचे प्रस्ताव ३१ मार्च,८९ पर्यंत खालोल बाबींची पूर्तता करुन त्यानंतरच प्रस्ताव या कार्यालयास सादर करावेत. दि. ३१.३.८९ नंतर आलेल्या प्रस्तावांचा विचार केला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

१) स्थानिक ठिकाणी इ.५ वी ते ७ वी चीप्राथमिक शाळा आहेत किंवा नाहीत असल्यास त्या वर्गांची पटसंख्या
२) जिल्हा परिषद/नगर परिषद शाळेत इ.५ वी ते ७ वी चे वर्ग असताना शाळेत ५वी ते ७ वी चे वर्ग सुरु करण्याची परवानगी देण्याबाबतचे जिल्हा परिषद/नगर परिषद चे "ना हरकत प्रमाणपत्र" प्राप्त करुन प्रस्तावासोबत सादर करावे.
३) माध्य. शाळेत ५ वी ते ७ वी चे वर्ग सुरु करावयाच्या वर्गासाठी आवश्यक शैक्षणिक व भौतिक सुविधा संस्थेने उपलब्ध करुन दिल्या आहेत का? त्याबाबतची माहिती -- (अ) एकूण वर्ग खोल्या
(ब) शिक्षक नियुक्ती , (क) शाळा नियमित कार्यरहीत रहाणेचे दृष्टिने संस्थेजवळ असलेली शिल्लक रक्कम इ.

वरील सर्व बाबींची पूर्तता करुन ८९-९० या शैक्षणिक वर्षात इ. ५ वी सुरु करण्यासाठी अर्ज या कार्यालयास वरील मुदतीत सादर करावा. शिक्षण उपसंचालकांची परवानगी प्राप्त झाल्याशिवाय इ. ५ वी सुरु केली जाणार नाही याची दक्षता घ्यावी.

स्थळप्रतीवर मा.शि.अ. यांची स्वाक्षरी असे.

[signature]
शिक्षणाधिकारी (माध्य)
जि.प.पुणे-११.

S/E/MIS/Pra-shi
001 14/11/83.

महाराष्ट्र शासन.

क्रमांक: व्हिएलएस१०८३/५३४४१[सीआर ९१] प्राशि-३

शिक्षण व सेवायोजन विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : 2 नोव्हेंबर, १९८३.

2 P

प्रति,

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे.

विषय :=सिध्देश्वर इंग्लिश मिडियम स्कूल, पुणे परवानगी मिळणेबाबत.

भोसरी जिल्हा पुणे येथील सिध्देश्वर इंग्लिश मिडियम स्कूल या नांवाने सुरु असलेल्या प्राथमिक शाळेस शासनाने घातलेली सर्वसाधारण बंदीची अट अंशत: शिथिल करुन अपवादात्मक परिस्थितीत "खास बाब" म्हणून कायम विना अनुदान तत्वावर खालील अटींच्या आधीन राहून शासन मंजूरी देत आहे.

१. नियमानुसार संस्था रजिस्टर्ड असली पाहिजे.

२. संस्थेने ही प्राथमिक शाळा कायम विना अनुदान तत्वावर चालविण्याची व भविष्यकाळात कधीही शासनाकडे अनुदानाची मागणी करणार नाही अशी लेखी संमती दिली पाहिजे.

३. संस्थेने शाळेचा एकूण शिक्षक वर्ग विहित वयोमर्यादित व प्रशिक्षित [एस. एस. सी. डी. एड. ] नेमलाच पाहिजे व त्यांना शासनाने ठरवून दिलेले वेतन व भत्ते दिले पाहिजेत.

४. संस्थेने शाळेसाठी स्वतंत्र व आधुनिक शैक्षणिक साहित्याने परिपूर्ण अशी स्वत:ची इमारत उपलब्ध केली पाहिजे.

५. शाळेतील प्रत्येक वर्गामध्ये शासनाने ठरवून दिलेली विद्यार्थी पटसंख्या व हजर संख्या असली पाहिजे.

६. संस्थेने जवळपासच्या शाळेवर आपल्या शाळेमुळे कोणताही दुष्परिणाम होणार नाही याची दक्षता घेतली पाहिजे.

७. शासनाने वेळोवेळी दिलेल्या आदेशाचे संस्थेने पालन केलेच पाहिजे.

८. शाळेच्या फीचे दर शासनाने विहित केल्यानुसार असले पाहिजेत. त्यापेक्षा जादा फी घेता कामा नये.

..२/-

९. मुंबई प्राथमिक शिक्षण नियमावली १९४९ मधील विहीत अटींची पूर्तता करणे आवश्यक आहे.

१०. नियमानुसार अनुसूचित जाती/जमातीच्या शिक्षकांचे प्रमाण भरलेच पाहिजे.

२. आपणास विनंती आहे की, वरील अटींची पूर्तता झाल्यानंतरच या-प्रकरणी नियमानुसार आवश्यक ती कार्यवाही करावी व आपल्या कार्यपूर्ततेचा अहवाल शासनास यथावकाश पाठवावा.

[ बं० कों० व्यवहारे ]
सहाय्यक सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत :-

शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे.
शिक्षणाधिकारी जिल्हा परिषद, पुणे.
प्रशासनाधिकारी, नगर पालिका शिक्षण मंडळ, पुणे.
प्राचार्य, सिध्देश्वर इंग्लिश मिडियम स्कूल, भोसरी, पुणे.
यांचेकडे माहितीसाठी आणि नियमानुसार आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

देऊळकर/२११८३.